Jagdamba Education Society's

**Santosh N. Darade Polytechnic**

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 03/09/2025

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या... आपलं महानगर My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## मराठी लोकशाहीर कृष्णराव साबळे



कृष्णराव गणपतराव साबळे उर्फ शाहीर साबळे हे मराठी लोकशाहीर म्हणून प्रसिद्ध होते. सातारा जिल्ह्यातील पसरणी (तालुका वाई) या छोट्या खेड्यात कृष्णराव साबळे यांचा ३ सप्टेंबर १९२३ रोजी जन्म झाला. त्यांचे भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत आणि संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीत शाहीर म्हणून फार मोठे योगदान होते. 'जय जय महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्र राज्याभिमानगीत आणि 'महाराष्ट्राची लोकधारा' या प्रयोगांसाठी ते प्रामुख्याने ओळखले जात. मुक्त नाट्याचे ते आद्य प्रवर्तक समजले जातात. शाहीर साबळे हे कवी-गीतकार-संगीतकार, गायक, कुशल ढोलकी वादक, अभिनेते-दिग्दर्शक तसेच उत्तम व्यवस्थापक आणि संघटक होते. 'महाराष्ट्राची लोकधारा'द्वारे त्यांनी मराठी लोकसंस्कृतीची ओळख आणि प्रसिद्धी केली. त्यांचे 'गर्जा महाराष्ट्र माझा, जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले. आज जय जय महाराष्ट्र माझा हे गीत महाराष्ट्र शासनाने राज्य गीत म्हणून स्वीकारले आहे.

तिसऱ्या इयत्तेत असताना साबळे अमळनेरला गेले. तेथे गेल्यावर आपल्याला चांगला आवाज आहे, हे त्यांच्या ध्यानात आले. हिराबाई बडोदेकर यांनी तेथे साबळे यांचे गाणे योगायोगाने ऐकले होते. त्यांच्या आवाजाचे कौतुक केले होते. शाहीर साबळे यांनी सामाजिक कार्यात बालपणीच सहभाग घेतला होता. अमळनेरला असताना साबळे यांना साने गुरुजींचा सहवास लाभला. पुढे मोठेपणीही चळवळीत त्यांना गुरुजींचे मार्गदर्शन मिळाले. साने गुरुजींच्या अनेक सामाजिक कार्यांमध्ये साबळेंचा सक्रिय सहभाग होता. पसरणी गावात भैरवनाथाच्या मंदिरात हरिजनांना प्रवेश देण्यासाठी गावातील तरुण मंडळींबरोबर त्यांनी पुढाकार घेतला. शाहीर साबळे ही संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासाची साक्षीदार असलेली एक धडाडती 'तोफ' होती. शाहीर साबळे यांचे २० मार्च २०१५ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Sep 03, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * CENTRAL LIBRARY * YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401